R.No.MAHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक १११ रविवार दि.०९ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# पक्षश्रेष्ठीने दिलेल्या उमेदवाराचे काम करुन निवडून आणा : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

## रघुकुल मंगल कार्यालयात २० प्रभागातील इच्छुकांनी दिल्या मुलाखती

उदगीर / प्रतिनिधी:– नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक थोड्याच दिवसात होणार असून यामध्ये आपल्या प्रभागाच्या विकास करणारा नगरसेवक आपण निवडून देणार असून यासाठी पक्षश्रेष्ठीने दिलेल्या उमेदवाराचे काम करुन निवडून आणा असे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीसाठी ईच्छुक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांच्या मुलाखतीसाठी उपस्थितांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडुन उमेदवारी मागणी करण्यासाठी रघुकुल मंगल कार्यालयात उमेदवारांची तुफान गर्दी होती. यावेळी आमदार संजय बनसोडे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अॅड.व्यंकट बेद्रे, सुरेखा पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे, चेअरमन भरत चामले, प्रदेश सरचिटणीस समीर शेख, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शफी हाशमी, दिपाली औटे, आदी उपस्थित होते.





पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, उदगीर शहराला स्मार्ट सिटी करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे.माझ्यासाठी काम करणा–या कार्यकर्त्यांना न्याय देणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले. शहरातील नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या वतीने उदगीर शहरातील सर्व प्रभागातील इच्छुक उमेदवारांची मुलाखत काल शनिवार दि.८ नोव्हेंबर २०२५ रोजी रघुकुल मंगल कार्यालय, उदगीर जि.लातूर येथे आयोजित करण्यात आली होती. या मुलाखतीस शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून नगराध्यक्षपदासाठी व नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांची मुलाखती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, सरचिटणीस तथा पक्षाचे निरीक्षक अॅड.व्यंकट बेद्रे , प्रदेश सरचिटणीस सुरेखा पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे यांनी घेतली.

# रूपाली Vs रूपाली! चाकणकरांवरील टीका पडली महागात; पक्षाकडून ठोंबरेंवर शिस्तभंग नोटीशीचा बडगा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत महिला प्रदेशाध्यक्ष तथा महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर आणि पक्षाच्या प्रवक्त्या रुपाली ठोंबरे या दोन महिला नेत्यांमध्ये अंतर्गत संघर्ष सुरु आहे. फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणांमध्ये चाकणकर यांनी तरुणीचं चारित्र्यहनन केला असल्याचा आरोप करत रुपाली ठोंबरे यांनी चाकणकर यांच्याविरोधात आंदोलन केले होते. या दोन्हीही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सुरू असलेल्या वादाची दखल आता पक्षाने घेतली आहे. त्याबाबत रुपाली ठोंबरे यांना पक्षाकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. चाकणकर यांच्या भूमिकेवर रुपाली ठोंबरेंकडून अनेकदा टीका रुपाली ठोंबरे यांना पक्षाने प्रदेश प्रवक्ते पदाची जबाबदारी दिली होती. त्यामुळे त्यांच्यावर पक्षाची भूमिका मांडण्याची जबाबदारी होती. मात्र, रुपाली ठोंबरे यांनी अनेकदा जाहीरपणे रुपाली चाकणकर यांच्याविरुद्ध भूमिका घेतली होती. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून रुपाली चाकणकर यांच्या भूमिकेवर रुपाली ठोंबरे यांनी अनेकदा टीका केली होती. मात्र आता आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर टीका करणं रूपाली ठोंबरे यांना अखेर महागात पडल्याचं दिसतयं.

## सहा महिन्यापासून फरार सराईत गुन्हेगार संघटित गुन्हेगारी टोळी अटक



लातूर :– सहा महिन्यापासून फरार सराईत गुन्हेगार संघटित गुन्हेगारी टोळी प्रमुख शक्ती उर्फ योगेश अशोक गुरणे व त्याचा उजवा हात टोळी सदस्य आकाश उर्फअक्षय सगट/सगर यांना अटक

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,, दि.०४/०६/२०२५ रोजी १६.०० वाजताचे सुमारास देवगिरी बार औसा रोड चांडेश्वर येथे आरोपी नामे १) शक्ती उर्फ योगेश अशोक गुरणे २) इस्माईल उर्फ बाबा जलिल शेख ३) किशोर बालाजी मस्के ४) आकाश उर्फ अक्षय सुरेश सगट उर्फ सगर व इतर १० आरोपीतांनी फिर्यादी अविनाश महादेव बोयणे यास देवगिरी बार येथे आम्हाला महिन्याला २००० रुपये हप्ता व आमच्या मुलांना फुकट सुपारी का देत नाहीस म्हणून गैर कायद्याची मंडळी जमून नमुद आरोपीतांनी फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी कत्ती, बारमधील खुर्च्याने मारहाण केल्याने पो.स्टे.लातूर ग्रामीण येथे गुरनं.१३३/२०२५ कलम १०९, ३०८ (१),१८९(२),१९१(२),१९१(३),१९०. भारतीय न्याय संहिता–२०२३ प्रमाणे दिनांक ०५/०६/२०२५ रोजी १९.०९ वाजता गुन्हा दाखल आहे. नमूद प्रकरणातील एकूण सहा आरोपी मागील सहा महिन्यापासून फरार होते त्यापैकी टोळीप्रमुख शक्ती उर्फ योगेश अशोक गुरने यास व त्याचा दुसरा साथीदार टोळी सदस्य आकाश सुरेश सगर उर्फ सगट या दोघांना गुन्ह्यात अटक करून आज रोजी मा. न्यायालया समक्ष हजर केले असता दोन्ही आरोपींना पाच दिवसाचा पीसीआर मा. न्यायालयाने मंजूर केलेला आहे. सध्या दोन्ही आरोपी पीसीआर मध्ये असून त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत व त्यांनी आजवर केलेल्या खंडणीच्या व दहशतीच्या संदर्भाने सखोल तपास सुरू आहे. नमुद गुन्हयातील आरोपीतांचे ताब्यातून गुन्हयात वापरलेले हत्यार लोखंडी कत्ती जप्त करण्यात आले आहेत. आरोपी नामे १) शक्ती उर्फ योगेश अशोक गुरणे २)इस्माईल उर्फ बाबा जलील शेख ३) किशोर बालाजी मस्के ४) आकाश उर्फ अक्षय सुरेश सकट उर्फ सगर त्यांचे गुन्हेगारी पार्श्वभुमीबाबत अधिक माहीती काढली असता त्यांचेविरुध्द लातूर शहरात दहशत व हिंसाचाराचा वापर करून, त्यांचे आर्थिक लाभाकरीता प्राणघातक हत्यारांनी सज्ज होऊन दरोडा टाकणे, जबरी चोरी करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन घातक हत्याराने जबर दुखापत करणे, चोरी करणे, खंडणी इत्यादी गंभीर स्वरुपाचे ११ गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे नमुद आरोपीतांविरुध्द मा. विशेष पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परीक्षेत्र नांदेड यांच्या परवानगीने महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कलमवाढ करण्यात आलेली होती. मोक्का कायद्याचे कलमवाढ केल्यानंतर आरोपी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३ (१) (ळळ), ३(२), ३(४) अन्वये गुन्हयाचे ८६० पानाचे दोषारोप पत्र मा. विशेष मोक्का न्यायालय लातूर येथे दाखल करण्याची मंजुरी मा. अपर पोलीस महासंचालक (कावसु) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून घेण्यात आलेली आहे. सदर आरोपीतां विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस अधिक्षक लातूर, श्री. मंगेश चव्हाण , अपर पोलीस अधिक्षक लातूर यांचे मार्गदर्शनात श्री. साहेबराव नरवाडे,उपविपोअ, लातूर ग्रामीण, अरविंद पवार पोलीस निरीक्षक पो.स्टे लातूर ग्रामीण यांचे नेतृत्वात करण्यात आली. सदर गुन्ह्याचे तपास कामात सपोनि बाळासाहेब डोंगरे, स्थानिक गुन्हे शाखा येथील सपोनि सदानंद भुजबळ पोलिस अंमलदार .माधव बिल्लापट्टे, प्रदीप स्वामी, धारेकर, तुराब पठाण वाजीद चिकले, कुंडलिक खंडागळे, प्रल्हाद केंद्रे, संतोष थोरात यांनी केलेली आहे.

## चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांची बाभळगाव निवासस्थानी महीला पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट

लातूर/ प्रतिनिधी :– विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांची माजी जिप सदस्या सुनीता आरळीकर यांच्या सोबत महीला पदाधिकाऱ्यांनी शनीवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी भेट घेतली. विलास साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांची बाभळगाव निवासस्थानी सुनीता आरळीकर यांच्या सोबत महीला पदाधिकारी लता काटे, दीपाली आदमाने, वर्षा सोनवणे, आरती देढे, आश्लेषा आदमाने, कोमल आदमाने,



अनुराधा सोनवणे, ज्योती सोनवणे, शिला भुंबे, भाग्यश्री शेळके आदींनी भेट घेतली. यावेळी चेअरमन वैशाली विलासराव देशमुख आणि महीला पदाधिकारी यांच्यात विविध विषयावर चर्चा पार पडली.

## मधुमेह, हृदय विकारसारखे आजार असल्यास अमेरिकेत नो एन्ट्री; डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचा नवा नियम

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने एकामागे एक आक्रमक भूमिका घेत असल्याचे दिसत आहे. अध्यक्षपदाच्या दुसऱ्या टर्ममध्ये ट्रम्प यांनी विविध देशावंर टॅरिफ लादणे, क–१इ व्हिसाचं शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला. यात आता आणखी एका नव्या निर्णयाचा समावेश करण्यात आला आहे. अमेरिकेत स्थलांतरित होऊ इच्छिणाऱ्या परदेशी नागरिकांना आता मधुमेह, लठ्ठपणा आणि हृदयरोग हृदय विकार या सारख्या दीर्घकालीन आजारांमुळे व्हिसा आणि ग्रीन कार्ड नाकारले जाऊ शकते.

सीबीएस न्यूजच्या रिपोर्टनुसार, मार्गदर्शक सूचना उच्चायूक्त कार्यालयांना आणि अधिकाऱ्यांना पाठवण्यात आल्या असून व्हिसा अधिकाऱ्यांनी व्हिसा अर्ज मंजूर करताना अर्जदाराच्या आरोग्याचा विचार करावा, असंही सांगण्यात आलं आहे.

परराष्ट्र विभागाने व्हिसा अधिकाऱ्यांना पाठवलेल्या एका पत्रात, ज्यांच्या आजारपणावरील उपचारांसाठी लाखो डॉलर्सचा खर्च होऊ शकतो, अशा अर्जदारांची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. नमूद केलेल्या आजारांच्या यादीमध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार, श्वसन आजार, कर्करोग, मधुमेह, चयापचय आजार, न्यूरोलॉजिकल आजार आणि मानसिक आजार यांचा समावेश आहे.

या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अधिकाऱ्यांना विशेषतः लठ्ठपणासारख्या परिस्थितींचा विचार करण्याचा सल्ला देण्यात आला आहे, कारण लठ्ठपणामुळे दमा, स्लीप एपनिया आणि उच्च रक्तदाब यासारखे आजार होऊ शकतात ज्याच्या उपचारासाठी मोठा खर्च येतो.

# रेणापुर नगरपंचायतीत कराड विरुद्ध देशमुख अटीतटीची लढत

## देशमुख परिवाराचा नगरपंचायत ताब्यात घेण्याचा निर्धार; तर आमदार कराड आत्मविश्वासाने रिंगणात



रेणापुर /प्रतिनिधी:– रेणापुर नगरपंचायतीच्या निवडणुकीत राजकीय तापमान चांगलंच वाढलं आहे. आमदार रमेश आप्पा कराड यांच्याविरुद्ध माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, माजी आमदार धीरज विलासराव देशमुख अध्यक्ष –लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लातूर,माजी मंत्री दिलीपराव देशमुख, अभिनेता रितेश देशमुख, तसेच लातूर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे सर्व नेते आणि कार्यकर्ते या निवडणुकीत सक्रियपणे सहभाग घेतील, अशी माहिती समोर येत आहे. सध्या नगरपंचायत ही आमदार रमेश आप्पा कराड यांच्या ताब्यात असून, ती काँग्रेसच्या नियंत्रणात आणण्यासाठी देशमुख परिवार पूर्ण ताकदीनिशी प्रयत्नशील आहे. जिल्हा बँक, साखर कारखाने आणि इतर महत्त्वाच्या संस्था देशमुख परिवाराच्या प्रभावाखाली असल्याने, ही निवडणूक कराड यांच्यासाठी काहीशी आव्हानात्मक ठरू शकते. तथापि, आमदार रमेश आप्पा कराड यांनी आपल्या मतदारसंघात केलेल्या विकासकामांमुळे आणि वैयक्तिक जनसंपर्कामुळे, या निवडणुकीतही कराडच बाजी मारतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे.



मागील विधानसभा निवडणुकीत रमेश आप्पा कराड यांनी माजी आमदार धीरज देशमुख यांचा दारुण पराभव करून मोठा राजकीय धक्का दिला होता. त्या पराभवामुळे देशमुख परिवाराची प्रतिष्ठा धोक्यात आली होती. त्यामुळे आता ती नाचक्की मिटवण्यासाठी देशमुख परिवार रेनापुर नगरपंचायत ताब्यात घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. राजकीय समीक्षकांच्या मते, या अटीतटीच्या लढतीचा निकाल संपूर्ण लातूर जिल्ह्यातील पुढील राजकीय समीकरणांवर परिणाम करणारा ठरू शकतो.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## ‘डोळसां’पुढील अंधकार

बुद्धिप्रामाण्य नाकारणारी एक गोष्ट मान्य केली तर पुढची साखळी आपोआपच सुरू होते ‘मानसिक तसेच शारीरिक अपंगत्व असलेल्या तुमच्या दोन मुली बर्‍या करतो’, असे सांगत पुण्यातील एका आयटी इंजिनीअरला तब्बल १४ कोटी रुपयांचा गंडा घालणार्‍या भोंदू बाबाचे आणि त्याच्या सहकार्‍यांचे प्रकरण जितके संतापजनक तितकेच करुण म्हणायला हवे. आता त्या बाबाला आणि त्याच्या सहकार्‍यांना अटक झाली असली तरी पुण्यासारख्या ‘राज्याची सांस्कृतिक राजधानी’, ‘विद्येचे माहेरघर’ आदी ख्यातीच्या शहरात कुणी एक भोंदूबाबा पोटापाण्यासाठी इंग्लंडपर्यंत जाऊन आलेल्या एका सुशिक्षित कुटुंबाला खुलेआम लुटतो याला काय म्हणायचे? कायदा सुव्यवस्था राखणार्‍या यंत्रणेचा धाक नाहीसा होतो तेव्हाच समाजातल्या बाजारबुणग्यांची ही हिंमत होऊ शकते. या व्यवस्थेने आपले काय करून घेतले आहे, ही यातली संतापजनक बाब. आणि कसली तरी अनामिक भीती घेऊन जगणारी अशी अनेक सुशिक्षित, सधन कुटुंबे श्रद्धेच्या नावाखाली अशाच कुठल्या तरी बुवा-बाबाच्या नादी लागून गंडे-धुपारे करत बसलेली असतात, हे यातले कारुण्य. देव, निर्गुण निराकार परमेश्वर किंवा निर्मिक अशी एखादी शक्ती मानणे आणि तिच्यापुढे नतमस्तक होऊन जगणे ही वेगळी गोष्ट. पण ‘मलाच देव माना’, असे म्हणत आपल्यासमोर जमलेल्या लोकांना व्रतवैकल्ये, कर्मकांडे यात गुरफटून लुबाडणे हा केवढा घोर अपराध आहे. आणि तो करणारे भोंदू बुवा- बाबा, तांत्रिक-मांत्रिक सतत उद्भवत असतात कारण ते झुकवतील तशी झुकायला, त्यांच्यामागे मेंढरे बनून जायला तयार असलेली माणसेही दर पिढीत नव्याने तयार होत असतात. फारसे शिक्षण नसलेली, जग माहीत नसलेली भोळी भाबडी माणसे अशा भामट्यांना बळी पडत असतील तर ते समजण्यासारखे आहे, पण सुशिक्षितांमधल्या अंधश्रद्धा हा प्रकार फारच घातक.

हा प्रकार कायम आहे, कारण समाज म्हणून आपण असेच आहोत. अपवाद वगळता अनेक राजकारणी, आयएएस - आयपीएस अधिकारी, मोठमोठे कलाकार, खेळाडू, बक्कळ पैसा मिळवणारे अनिवासी भारतीय हे लोक कोणत्या ना कोणत्या बुवा-बाबाच्या चरणी लीन असतात. आपल्याकडे जे आहे ते टिकून राहावे यासाठी तो बुवाबाबा सांगेल त्या पूजा, उपाय करतात, शक्यता अशी की सहजमार्गाने येणारा पैसा तितक्याच सहजपणे निघून जाऊ नये, या अनामिक भीतीपायी ही बडी मंडळी अशा बुवाबाबांच्या मागे जात असावीत. तांत्रिक- मांत्रिक मंडळींचा आणि या लोकांचा तर एकदम घनिष्ठ संबंध. काळी जादू या प्रकारावर विश्वास असणार्‍या आणि त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेलाही कामाला लावणार्‍या राजकारण्यांच्या सुरस आणि रम्य कथा त्यांच्या निकटवर्तीयांकडून नेहमी चर्चिल्या जातात. अगदी आत्ताही आजारपणामुळे उपचार घेत असलेल्या एका बड्या राजकीय नेत्यावर कोणी करणी किंवा काळी जादू केली आहे, याच्या चर्चा समाजमाध्यमांतून रंगत राहातात.

आपला सर्वच पातळ्यांवरचा प्रभाव कमी होऊ नये या भीतीपोटी समाजाच्या वरिष्ठ स्तरातली मंडळी हे सगळे उद्योग करत असतील, हे गृहीत धरले तर सर्वसामान्यांचे काय? शिकले सवरलेले मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय अशा थोतांडाला का बळी पडतात? याचे उत्तर पुन्हा आपल्या व्यवस्थेतच दडलेले आहे. आपल्या शिक्षणव्यवस्थेत विचार करायला कुठे शिकवले जाते? प्रश्न विचारण्यापेक्षा घोकंपट्टी करणे, आज्ञाधारक असणे, ‘बाबा वाक्यम प्रमाणम्’नुसार वागणे हे गुणी बाळाचे लक्षण. घरातील वडीलधार्‍यांचे सांगणे चूक असो वा बरोबर, तेच अवलंबले पाहिजे. कोणत्याही गोष्टीमागे, अगदी आपल्या जगण्यामागेदेखील कार्यकारणभावच असतो, असे मानणे हा विज्ञानाचा मार्ग. बुद्धिप्रामाण्य किंवा किमान विवेक जागृत ठेवणे हे या मार्गावर असल्याचे लक्षण. पण त्याऐवजी तुमची प्रत्येक गोष्ट कोणाच्या तरी कृपेने होते, असे सांगितले जाते, तेव्हा आपोआप ते पोर दहावीत चांगले मार्क मिळावेत म्हणून एखाद्या देवळात किंवा आईवडिलांबरोबर एखाद्या बुवांच्या दरबारात जाऊ लागते. आपल्या प्रत्येक गोष्टीला आपणच जबाबदार असतो, हा तर्कशुद्ध बुद्धिवाद स्वीकारण्यापेक्षा त्याची जबाबदारी कोणाच्या तरी खांद्यावर टाकली की जगणे सोपे होऊन जाते. कोणाच्याही अंगी दैवी शक्ती वगैरे काही नसते, असलीच तर इतरांपेक्षा बुद्धी आणि चलाखी थोडी जास्त असते, हे ज्यांना समजते ते अशा कोणाच्या वार्‍यालाही उभे राहात नाहीत. पण हे समजत नाही, स्वीकारता येत नाही, अशांची पैदास खूप. देवाच्या नावावर ठगगिरी करणार्‍यांच्या डोळ्यात डोळे घालून त्यांना प्रश्न विचारले पाहिजेत, हे त्यांना कोणी शिकवत नाही. त्यांच्यासमोर नतमस्तक व्हायचे असते, हेच आधी कुटुंबात सांगितले जाते आणि शिक्षणव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत त्याला खतपाणी घातले जाते. मग ठिकठिकाणच्या बुवाबाबांच्या दरबारात अशा बाळबोधांचा मेळाच जमतो आणि मग त्याचा बघता बघता बाजार होतो. कुणी लुबाडून घ्यायला तयार असाल, तर त्याला लुबाडणारेही असणारच हा तर जगाचा न्याय. आयुष्य आहे, तर चढउतार येणारच, त्यांना भिडले पाहिजे असा विचार करण्याऐवजी संकटांनी भेदरून जाणारे हमखास बळीचे बकरे ठरतात. त्यामुळे श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यामध्ये असलेली तरल, पुसट रेषा आपण कधी ओलांडली हे भल्याभल्यांना कळत नाही, याची कितीतरी उदाहरणे सांगता येतात.

इस्रोसारख्या संस्थेच्या शास्त्रज्ञांनी २०२३ मध्ये ते प्रक्षेपित करणार होते, त्या क्षेपणास्त्राची प्रतिकृती प्रक्षेपणाआधी तिरुपतीला बालाजीच्या चरणी नेऊन अर्पण केली होती. एका विशिष्ट बाबांना मानणार्‍या एका प्रसिद्ध डॉक्टरांनी त्यांच्या क्लिनिकमधल्या त्यांच्या केबिनमध्ये अशाच एका भक्तप्रिय बाबांचे भिंत भरून छायाचित्र लावले आहे आणि प्रत्येक भक्ताला तपासण्याआधी त्या छायाचित्रातल्या बाबांना नमन करून, त्यांचा आशीर्वाद घेऊन मगच ते आपली वैद्याकीय सेवा सुरू करतात. ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारी एक खेळाडू ती ज्यांना मानते अशा एका बाबांचे छायाचित्र आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्व स्पर्धांदरम्यान आपल्याबरोबर घेऊन जात असे. याशिवाय अगदी लहानसहान कामांसाठी शुभमुहूर्त पाहणे, वास्तुशास्त्रानुसार घर, कार्यालयाची रचना करणे, विशिष्ट रत्ने परिधान करणे, लिंबू मिरची लावणे, नजर उतरवणे, शकुन अपशकुन मानणे, जन्मपत्रिकेनुसार गोष्टी करणे अशा कितीतरी गोष्टी रोजच्या आयुष्यात सर्रास केल्या जातात. या सगळ्या अंधश्रद्धा आहेत, हेच अनेकांच्या गावी नसते. या छोट्याछोट्या गोष्टीच तर आहेत, त्या करून बघितल्या तर त्यात नुकसान काय असाही अनेकांचा प्रश्न असतो. पण बुद्धिप्रामाण्य नाकारणारी एक गोष्ट मान्य केली तर पुढची सगळी साखळी आपोआपच तुमच्यासमोर येऊन ठेपते. ती कशी नाकारणार? जीवघेण्या संकटांसमोर माणसे अनेकदा हतबल होतात आणि परिस्थितीशरण बनतात. त्यातून ती अशा मार्गांना लागतात, त्यांची बुद्धी गहाण ठेवतात, असे या परिस्थितीचे स्पष्टीकरण असू शकते. पण तेदेखील समाज म्हणून आपले अपयशच नाही का? संकटग्रस्त माणसांना त्यातून मार्ग शोधण्यासाठी, बाहेर पडण्यासाठी दिलासा देणारे वातावरण किंवा यंत्रणा का असू शकत नाही? पुण्यातील प्रकरणात पदरी विशेष मूल असणे या प्रश्नावर बुवाबाबाच काहीतरी करू शकतात, हा विचार सुशिक्षित पालकांनीही केला, कारण या मुलांसाठी उपलब्ध संस्थात्मक पर्याय त्यांच्यापर्यंत पोहोचले नाहीत किंवा त्या पर्यायांपर्यंत पालक पोहोचले नाहीत. मित्रमंडळी, नातेवाईक यांचा भक्कम आधारही अनेकदा अशा खड्ड्यांमध्ये पडण्यापासून वाचवतो. आजच्या वेगवान जगण्यात आपले असे आधारही हरवत चालले आहेत का याचाही विचार करायला हवा. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जादूटोणा-विरोधी कायदा असो वा अंधश्रद्धा निर्मूलन समितीसारख्या संघटना- त्यांचे असणेही त्यांनी एकदा तपासून पाहायला हवे.

# सावकारांच्या कर्जाचे आव्हान

अलीकडेच राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) प्रसिद्ध केलेल्या ग्रामीण धारणा सर्वेक्षण अहवाल २०२५ मध्ये ग्रामीण भारतातील कर्ज वितरण आणि त्यासंबंधी अडचणींवर काही अतिशय महत्त्वाच्या बाबी नमूद झाल्या आहेत.

नाबार्डच्या अहवालातील पहिली महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागात ५४.५ टक्के कुटुंबे आता केवळ औपचारिक स्रोतांद्वारेच (प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी संस्था, सूक्ष्म वित्त संस्था इ.) कर्ज घेत आहेत. हा टक्का सर्वेक्षण सुरू झाल्यापासूनचा सर्वाधिक आहे. औपचारिक स्रोतांतून कर्ज देताना काही ठरावीक सरकारी नियम व व्याजदर लागू असतात, त्यामुळे शेतकर्‍यांना शोषणापासून संरक्षण मिळते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भारतात औपचारिक कर्ज व्यवस्थेत सुधारणा झाली असली, तरी अजूनही अनेक कुटुंबे सावकार, नातेवाईक, मित्र व इतर अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहेत.




सुमारे २२ टक्के ग्रामीण कुटुंबे पूर्णपणे सावकारांवर आणि अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहेत. या वर्गाकडून अजूनही १७-१८ टक्क्यांपेक्षा अधिक व्याजदराने कर्ज दिले जाते. अहवालात असेही नमूद आहे की २३.५ टक्के कुटुंबे औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही स्रोतांवरून कर्ज घेतात. तथापि, ग्रामीण भागातील औपचारिक कर्ज व्यवस्थेने गेल्या काही वर्षांत निश्चितच चांगली प्रगती केली आहे.

विविध अहवालांनुसार किसान क्रेडिट कार्ड (केसीसी), कृषी इन्ङ्गास्ट्रक्चर ङ्गंड, सहकारी संस्था, स्वयं सहाय्य गट, ग्रामीण बँकिंग व्यवस्था इत्यादींच्या माध्यमातून शेतकर्‍यांना औपचारिक कर्जांशी जोडण्यात यश आले आहे. या उपाययोजनांमुळे ग्रामीण लोकांची क्रयशक्ती वाढली, डिजिटल व्यवहारात वाढ झाली, खप वाढला, जीवनमान सुधारले आणि पूरक उत्पन्नाचे स्रोत निर्माण झाले.

याशिवाय २०१९ मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजना ही देशातील कोट्यवधी लहान आणि सीमांत शेतकर्‍यांसाठी आर्थिक आधारस्तंभ ठरली आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ९.७ कोटींहून अधिक शेतकर्‍यांना २० हप्त्यांमध्ये ३.९ लाख कोटी रुपये थेट लाभांतर्गत (डीबीटी) स्वरूपात देण्यात आले आहेत. यामुळे त्यांना शेतीच्या खर्चाचा मोठा भार कमी झाला आहे. त्याचप्रमाणे एप्रिल २०२० मध्ये सुरू झालेल्या प्रधानमंत्री स्वामित्व योजनेअंतर्गत ग्रामीण नागरिकांना त्यांच्या जमिनीचा कायदेशीर हक्क मिळवून देण्यात येत असून, त्यामुळे त्यांचे आर्थिक सशक्तीकरणाचे नवे पर्व सुरू झाले आहे.

परंतु चिंताजनक बाब म्हणजे अजूनही २२ टक्के ग्रामीण लोकसंख्या सावकार आणि अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लहान शेतकर्‍यांची आर्थिक सुरक्षा धोक्यात येत आहे. जेव्हा या शेतकर्‍यांना उत्पन्नातील अस्थिरता, ऋतुमानिक जोखमी आणि सरकारकडून अपुर्‍या निधी हस्तांतरणाची समस्या भेडसावते, तेव्हा ते सावकारांच्या दाराशी मदतीसाठी पोहोचतात. यासाठी त्यांना प्रचंड व्याजदराचा सामना करावा लागत असला तरी त्याशिवाय दुसरा पर्यायच या शेतकर्‍यांकडे उपलब्ध नसतो.

अनेकदा सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय कारणे देखील सावकारांकडून कर्ज घेण्याला प्रवृत्त करतात. काही वेळा शेतकरी औपचारिक स्रोतांद्वारे कर्ज घ्यायचे ठरवतात, पण कागदपत्रांची कमतरता, हमीदारांचा अभाव आणि इतर कठीण अटींमुळे ते मागे हटतात. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या (एनएसओ) अहवालानुसार, सुमारे ५० टक्के कृषी कुटुंबे कर्जबाजारी आहेत. त्यांना संस्थात्मक बँकांबरोबरच गैरसंस्थात्मक स्रोतांवर म्हणजे सावकार व नातेवाईकांवर अवलंबून राहावे लागते. अनेकदा शेतकर्‍यांना जड व्याजामुळे मूळ रक्कम ङ्गेडता येत नाही आणि व्याजाचा भार कमी करण्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागते. अशा रीतीने ते सावकारांच्या कर्जजाळ्यात अडकत जातात.

गेल्या दशकात गावांमध्ये बँक शाखांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२४-२५ च्या वार्षिक अहवालानुसार, मार्च २०१० मध्ये ग्रामीण भागात ३३,३७८ बँक शाखा होत्या, तर डिसेंबर २०२४ पर्यंत हा आकडा ५६,५७९ वर पोहोचला आहे. तसेच सहकारी संस्थांचेही नवे जाळे उभे राहिले आहे. मात्र, सावकारांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी ङ्क्त शाखा वाढविणे पुरेसे नाही. नव्या रणनीतींनुसार छोटे व अल्पमुदतीचे कर्ज प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे. तसेच ग्रामीण भागातील लघुउद्योग आणि उद्योजकांना विश्वासार्ह संस्थात्मक आर्थिक सेवा मिळाव्यात यासाठी ठोस धोरणात्मक उपाययोजना कराव्या लागतील.

विशेष म्हणजे, ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठी गैर-बँकिंग वित्तीय कंपन्यांची भूमिका अधिक प्रभावी बनवावी लागेल. गावांमधील तरलतेची अडचण सोडवण्यासाठी एनबीएङ्गसींसाठी एक मजबूत पुनर्वित्त सुविधा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. तसेच डअठऋअएडख अधिनियमाअंतर्गत तारण हक्काची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारी कर्ज मर्यादा कमी करणे हा अत्यंत लाभदायक निर्णय ठरू शकतो. या सुधारणांसोबतच आर्थिक साक्षरतेचा प्रसार आणि ग्रामीण आजीविका कार्यक्रमांशी निगडित मूलभूत वित्तीय शिक्षण यांद्वारे सावकारांवरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे.

# रोजगार विरुद्ध मौन

बिहारच्या मतदारांनी आपल्या हातात तराजू घेण्याची वेळ आहे. विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी लवकरच मतदान सुरू होईल. अशातच, तेजस्वी यादव यांनी रोजगाराचे आश्वासन दिले, मात्र मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मौन पाळले. दोघांपैकी कुणाच्या पारड्यात वजन टाकायचं हे मतदारांना ठरवायचे आहे.

बिहारची जनता विधानसभा निवडणुकीसाठी आता सज्ज आहे. दोन दिवसानंतर अर्थात येत्या गुरुवारी पहिल्या टप्प्यातील १२१ जागांसाठी मतदान केले जाणार आहे. बिहारवासीयांचा आशीर्वाद मिळविण्यासाठी भाजप आणि इंडिया आघाडीने आपापले जाहीरनामे प्रकाशित केले आहे. बिहारवासीसुद्धा त्यास काय प्रतिसाद द्यायचा यासाठी सज्ज झाले आहेत.

निवडणूक आयोग, राजकीय पक्ष आणि मतदान तयार आहेत. बिहारमध्ये आता राजद नेते तेजस्वी यादव यांनी तरूणांना दिलेले रोजगाराचे वचन आणि रालोआच्या निवडणुकीचा जाहीरनामा जारी होत असताना मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बाळगलेले मौन या दोन्ही घटनांची आता चर्चा बिहारमध्ये रंगली आहे. सोबतच तुलनासुद्धा होऊ लागली आहे.

यात जुन्या आठवणी, नवीन आश्वासने आणि भावनांची भरती उफाळून आली असताना दोन दिवसानंतर मतदान केले जाणार आहे. दरम्यान, निवडणूक चर्चेत दोन प्रतिकात्मक प्रतिमांनी वर्चस्व गाजवले आहे. एका बाजूला राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांचे तेजस्वी प्रण अर्थात प्रत्येक घरातून एका माणसाला सरकारी नोकरीचे आश्वासन. दुसरीकडे, एनडीएच्या जाहीरनाम्याच्या लाँचिंग स्टेजवर मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे स्तब्ध मौन. हे फोटो केवळ दृश्यमान नाहीत तर निवडणूक कथेला आकार देणारे शस्त्र बनले आहेत.

एनडीएच्या जाहीरनाम्याच्या लाँचिंग स्टेजवर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बाळगलेल्या मौनमुळे बिहारचे राजकारण तापविले आहे. विरोधकांच्या हातात आयते कोलीत दिले आहे असं म्हटलं तरी चुकीचे होणार नाही. स्टेजवर उभे राहणे, फक्त जाहीरनामा दाखविणे आणि अंतर्ध्यान पावल्यासारखे मौन धारण करणे राजकारणात मोठे शस्त्र बनले आहे. महाआघाडीने लगेच याचा वापर करायला सुरुवात केली. नितीशबाबू बोलू शकत नाहीत आणि भाजप त्यांना बोलू देत नाही, असा घणाघात विरोधकांकडून केला जात आहे.

तेजस्वी यादव, मुकेश साहनी आणि अशोक गेहलोत यांच्यापासून प्रत्येकाने या मुद्द्यावर हल्लाबोल केला. तेजस्वी यांनी हल्लाबोल केला. भाजपने नितीश कुमार यांचा आवाज दाबला आहे. ज्यांना बोलूच दिले जात नाही ते बिहार कसे चालवतील, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. याची दुसरी बाजू अशी की, नितीश कुमार यांनी स्टेजवर नक्कीच मौन बाळगले होते. परंतु, मैदानात अर्थात प्रचारसंभांमध्ये ते जोरदार भाषण करीत आहेत. निवडणूक सभांमध्ये सतत बोलत आहेत. विरोधकांवर तीव्र हल्ले करत आहेत आणि थेट महाआघाडीच्या नोकरी-विरुद्ध-रोजगार राजकारणावर हल्ला करत आहेत. याचा अर्थ हा मौन कायमचा नाही. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा हे नितीश कुमार यांना यापुढे मुख्यमंत्री बनविणार नाही असा प्रचार विरोधकांनी सुरू केला आहे. त्यास रालोआने स्पष्टीकरण द्यायला सुरुवात केली आहे.

भाजपला हे समजले आहे की निवडणुकीत विकासाचा रेकॉर्ड दाखवण्यापूर्वी नेतृत्वाची विश्वासार्हता जपणे आवश्यक आहे. नितीशच्या मौनामुळे निर्माण झालेल्या संकटाचा सामना करण्यासाठी पक्षाचे वरिष्ठ नेते पुढे आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्रिपदावर मौन सोडले; पण चित्र स्पष्ट केले नाही. रोजगाराच्या मुद्द्यावर, भाजपने सरकारी नोकर्‍या विरुद्ध एकूण रोजगार हा मुद्दा उपस्थित केला. एनडीए स्टार्टअप्स, उद्योग आणि खासगी गुंतवणुकीद्वारे रोजगाराचे एक व्यापक मॉडेल सादर करण्याचा प्रयत्न करत आहे. केवळ सरकारी नोकर्‍यांनी बेरोजगारीची समस्या सुटणार नाही, असा तर्क त्यांच्याकडून दिला जात आहे.





एनडीएच्या जाहीरनाम्याच्या प्रकाशनादरम्यान मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या मौनामुळे निवडणुकीच्या वातावरणात एक मजबूत आणि अस्वस्थ प्रतिध्वनी निर्माण झाली. व्यासपीठावरील त्यांचे मौन आणि फक्त जाहीरनामा दाखवण्याच्या त्यांच्या पावित्र्याने विरोधकांना अत्यंत आवश्यक असलेला दारूगोळा पुरविला आहे. महाआघाडीने लगेचच या मौनाचे राजकीय सत्ती आणि भाजपचे नियंत्रण राजकारण म्हणून चित्रण केले. बिहारला दिल्लीच्या आदेशावर चालणारा मुख्यमंत्री हवा आहे की बिहारच्या जनतेच्या मनानुसार चालणारा हवा आहे, असा प्रश्न विरोधकांकडून विचारला जाऊ लागला आहे. तेजस्वी यादव आणि मुकेश साहनी यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत यांच्यासह टोमणा मारला की नितीश कुमार आता निर्जीव झाल्यासारखे आहेत. महाआघाडीने भावनिक वार केला आहे. छठ मैय्याचा अपमान, बाहेरील लोकांचा आदर, कुटुंबातील सदस्यांचा अपमान यासारख्या घोषणा स्थानिक अभिमानाच्या बळकटीकरणाला थेट मजबूत करीत आहेत. यासर्व गोष्टीमुळे नितीश कुमार बॅकफूटवर आले आहे. महाआघाडीचे संपूर्ण प्रयत्न या वस्तुस्थितीवर केंद्रित आहेत की नितीश आता पूर्वीसारखे मजबूत नेते राहिलेले नाहीत आणि त्यांना बाजूला केले जात आहे. नोकरी विरुद्ध सुशासन या जुन्या वादविवादापासून तेजस्वी यादव यांनी निवडणुकीचे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक घरासाठी सरकारी नोकरीचे आश्वासन हे बिहारच्या सर्वात मोठ्या वेदनादायक मुद्द्याला संबोधित करणारे भावनिक शस्त्र होय. म्हणूनच एनडीएला आपली निवडणूक रणनीती बदलावी लागली आहे. १ कोटी सरकारी आणि खासगी नोकर्‍या देण्याचे आश्वासन देऊन तेजस्वीच्या हल्ल्याची धार कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

बिहारची ही निवडणूक केवळ आकडे विरुद्ध आश्वासने यापर्यंत मर्यादित नाही. तेजस्वी यांची आक्रमक शैली आणि युवा-केंद्रित मोहीम राज्यात बदल घडवून आणण्यासाठी तरूणांना प्रेरित करीत आहे. तर नितीश यांचे मौन आणि मोदी-नितीश यांचा आत्मविश्वास स्थिरतेचे आश्वासन देतो. मतदारांसमोर दोन पर्याय आहेत. नितीश यांचा अनुभव आणि भाजपची विकासाची हमी. दुसरीकडे, तेजस्वी यांचे नोकरीचे आश्वासन आणि परिवर्तनाची लाट. यावेळी लढाई करिअर विरुद्ध नेतृत्व, मौन विरुद्ध ठामपणा आणि कामावर कोणावर विश्वास ठेवावा यामधील आहे.

केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांचे काका आणि राष्ट्रीय लोक जनशक्ती पक्षाचे (आरएलजेपी) प्रमुख पशुपती कुमार पारस यांनी चिराग पासवान यांच्या विरोधात दंड थोपटण्याची जाहीर घोषणा केली. चिराग पासवान यांचा पक्ष ज्या ज्या मतदारसंघात उमेदवार उभे करेल तेथे आपला पक्ष उमेदवार उतरवेल असे सांगून ते थेट मैदानात उतरले आहेत. आरएलजेपी प्रमुखांनी पक्षाच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत ही घोषणा केली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने चिराग पासवानसोबत भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्यावर पारस यांनी गेल्या वर्षी केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, आरएलजेपी एलजेपी (रामविलास) यांनी लढवलेल्या सर्व जागांवर आपले उमेदवार उभे करेल. हाजीपूरचे खासदार चिराग पासवान हे एनडीएमध्ये सन्मानजनक करारासाठी भाजपशी वाटाघाटी करत असताना ही घोषणा करण्यात आली. एनडीएमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा जेडीयू, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी यांचा हिंदुस्तानी अवाम मोर्चा आणि उपेंद्र कुशवाह यांचा आरएलपीएम यांचाही समावेश आहे. पारस आणि चिराग दोघेही एकेकाळी रामविलास पासवान यांनी स्थापन केलेल्या लोक जनशक्ती पक्षाचा भाग होते. मात्र आता एकमेकांविरूद्ध उभे ठाकले आहेत. हाही सामना रंगतदार होणार आहे

# ‘हा’ जीवघेणा कॅन्सर वयाच्या ३०व्या वर्षापूर्वीही होऊ शकतो, याच्या लक्षणांकडे अजिबात करू नका दुर्लक्ष



बदलती जीवनशैली, चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि वाढत्या ताणतणावामुळे पूर्वीपेक्षा कमी वयात अनेक गंभीर आजार दिसून येत आहेत. कर्करोग हा अशा आजारांपैकी एक आहे ज्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ७ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय कर्करोग जागरूकता महिना साजरा केला जातो. कर्करोगाचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी एक म्हणजे कोलन कर्करोग. पूर्वी हा आजार ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये आढळत होता. मात्र, आता २० ते ४० वयोगटातील तरूणांमध्ये याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. सुरूवातीची लक्षणे ओळखणे आणि त्वरित चाचणी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण उपचारांना विलंब करणे महागात पडू शकते. सुरूवातीला काही लक्षणे दिसली तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तर मग जाणून घेऊ की, कोलन कर्करोगाची नेमकी कोणती लक्षणे आहेत

सतत पोटदुखी आणि पेटके– वारंवार पोटदुखी, गॅस किंवा पेटके येणे ही समस्या वाटू शकते, मात्र ती कोलन कर्करोगाचे प्रारंभिक लक्षण असू शकते.

पोट रिकामे करण्यात अडचण– जर तुम्हाला वारंवार बद्धकोष्ठता, अतिसार किंवा पोट रिकामे करण्यात अचानक बदल जाणवत असेल तर ते हलक्यात घेऊ नका.

मलमध्ये रक्त येणे– रक्तस्त्राव किंवा काळा मल हा एक गंभीर धोक्याचा इशारा आहे.

अचानक वजन कमी होणे– कोणत्याही कारणाशिवाय जलद वजन कमी होणे हे शरीरात गंभीर आजार असल्याचे दर्शवते.

सतत थकवा आणि अशक्तपणा– पुरेशी झोप घेतल्यानंतरही शरीरात अशक्तपणा येणे हे लोहाच्या कमतरतेचे आणि कर्करोगाचे लक्षण अशू शकते.

पोट फुगणे– बराच काळ पोटात फुगणे किंवा जडपणा जाणवणे हे देखील एक लक्षण आहे.

भूक न लागणे– जेवताना नियमितपणे भूक न लागणे आणि लवकर पोट भरल्यासारखे वाटणे हे लक्ष देण्यासारखे आहे.

कोलन कर्करोग रोखण्यासाठी जीवनशैली आणि आहाराकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे यापासून वाचण्यासाठी काही पथ्य पाळणं गरजेचं आहे.

कोलन कर्करोगाची लक्षणे जाणवल्यास आहारात काय बदल करावेत?

फायबरयुक्त आहार– तुमच्या रोजच्या आहारात संपूर्ण धान्य, हिरव्या भाज्या आणि फळे समाविष्ट करा.

लाल मांस आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांपासून दूर रहा. याचे जास्त सेवन केल्याने कोलन कर्करोगाचा धोका वाढतो.

पुरेसं पाणी प्या. शरीर हायड्रेट ठेवल्याने पचनसंस्था निरोगी राहते.

दररोज किमान ३० मिनिटे योगा, चालणे किंवा कोणतीही शारीरिक हालचाल करा.

धूम्रपान आणि मद्यपान टाळा. या सवयी कर्करोगाचा धोका अनेक पटींनी वाढवतात.

जर कुटुंबात कर्करोगाचा इतिहास असेल, तर वेळोवेळी कोलोनोस्कोपी आणि इतर चाचण्या करायला विसरू नका.

ध्यान, प्राणायम आणि पुरेशी झोप यामुळे मानसिक आरोग्य चांगले राहते आणि आजारांचा धोका कमी होतो. ताणतणाव कमी करण्याचा प्रयत्न करा.

## दिवसाची सुरुवात होईल उत्साहाने! सकाळच्या नाश्त्यासाठी १० मिनिटांमध्ये बनवा पौष्टिक रव्याचा चिल्ला

सकाळच्या नाश्त्यात प्रत्येकालाच काहींना काही चमचमीत आणि टेस्टी पदार्थ खाण्यास हवे असतात. सकाळी पोटभर नाश्ता करणे आवश्यक आहे. नाश्ता केल्यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि लवकर भूक लागत नाही. सकाळच्या नाश्त्यात कायमच कांदापोहे, उपमा, शिरा आणि इडली खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं खूप जास्त इच्छा होते. अशावेळी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये रव्याचा चिल्ला बनवू शकता. रव्याचा वापर करून सकाळच्या नाश्त्यात किंवा जेवणात अनेक वेगवेगळे बनवले जातात. पोटभर नाश्ता केल्यामुळे संपूर्ण दिवस आनंदात जातो आणि शरीराला सुद्धा अनेक फायदे होतात. बऱ्याचदा लहान मुलं भाज्या आणि कांदा टोमॅटो खाण्यास नकार देतात. जेवणातील कांदा टोमॅटो बाहेर काढून फेकून दिला जातो. अशावेळी तुम्ही मुलांसाठी अनेक नवनवीन पदार्थ बनवून खाण्यास देऊ शकता. चला तर जाणून घेऊया रव्याचा चिल्ला बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

रवा
मीठ
कांदा
टोमॅटो
हिरवी मिरची
दही शिमला मिरची
कोथिंबीर
तेल

कृती: रव्याचा चिल्ला बनवण्यासाठी सर्वप्रथम, कांदा टोमॅटो आणि इतर भाज्या स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर भाज्या व्यवस्थित बारीक चिरा. यामुळे लहान मुलं भाज्या खातील.

टोपात वाटीभर रवा घेऊन त्यात दही, चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा. त्यानंतर त्यात बारीक चिरून घेतलेल्या भाज्या आणि हिरवी मिरची घालून व्यवस्थित मिक्स करा.

सगळ्यात शेवटी तयार केलेल्या मिश्रणात बारीक चिरलेली कोथिंबीर घालून मिक्स करा. पिठात गुठळ्या राहू नये म्हणून त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून मिक्स करा. तयार केलेले पीठ काहीवेळ झाकण लावून ठेवा.





तवा गरम करून त्यावर तेल पसरवा. त्यानंतर रव्याचे मिश्रण गोलाकार पसरवून दोन्ही बाजूने व्यवस्थित शेकवून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला रव्याचा चिल्ला. हा पदार्थ हिरवी चटणी किंवा खोबऱ्याच्या चटणीसोबत अतिशय सुंदर लागेल.

# भाजलेले चणे खाल्ल्याने होऊ शकतो कॅन्सर? डॉक्टरांनी दिली धक्कादायक माहिती; कोणावर होणार परिणाम जाणून घ्या



दिवसभर एनर्जी टिकून राहावी म्हणून प्रत्येकालाच ऊर्जा हवी असते. विशेषतः काम करणाऱ्या तरुणाईला, दिवसभराच्या ताणतणावात ऊर्जा टिकवणे आवश्यक असते. यासाठी आहारात ऊर्जा देणारे पदार्थ खाणे ही एक सोपी पद्धत आहे. त्यासाठी अनेक जण चणे खातात; जे आवश्यक पोषक तत्त्वांनी भरलेले असतात. बहुतेकदा निरोगी, प्रथिनेयुक्त नाश्ता म्हणून भाजलेले चणे खाल्ले जातात. पण, पॅक केलेले किंवा व्यावसायिकरित्या भाजलेले चणे दिसतात तितके पौष्टिक नसतात. काहींमध्ये रासायनिक अवशेष किंवा असे काही पदार्थ असू शकतात; जे नियमितपणे सेवन केल्यास तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो;असे दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलच्या क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट, डॉक्टर दीपाली शर्मा म्हणाल्या आहेत. सगळ्यात चिंताजनक बाब म्हणजे ॲक्रिलामाइड. ॲक्रिलामाइडएक रासायनिक संयुग आहे; जे उच्च तापमानावर भाजलेले किंवा तळलेले असताना नैसर्गिकरित्या तयार होतात. क्रिलामाइड हे एक रासायनिक उत्पादन आहे; जे माययार्ड रिक्शन दरम्यान तयार होतं.

भाजलेल्या पदार्थ सोनेरी–तपकिरी रंगात बदलणे, त्यांना चव आणि सुगंध येतो हीच माययार्ड रिॲक्शन असते. भाजलेले चणे तयार करताना उष्णतेमुळे रासायनिक प्रक्रिया माययार्ड रिॲक्शन तयार होते. या प्रक्रियेमुळे ॲक्रिलामाइड नावाचे एक उप–उत्पादन तयार होऊ शकते. नैसर्गिकरित्या उद्भवणारे अमीनो आम्ल एस्पॅराजिन आणि कमी करणारे साखर (जसे की ग्लुकोज आणि फ्रुक्टोज) जे वनस्पती–आधारित पदार्थांमध्ये आढळतात; ज्यामध्ये चणे यांचा समावेश आहे.भाजण्याचा वेळ जितका जास्त आणि तापमान जितके जास्त असेल तितकेच माययार्ड रिएक्शन जास्त होते आणि त्यामुळे ॲक्रिलामाइडचे प्रमाण वाढू शकते; असे आहारतज्ज्ञ आणि प्रमाणित मधुमेह शिक्षक डॉक्टर अर्चना बत्रा म्हणाल्या आहेत.

डॉक्टर बात्रा यांच्या मते, ॲक्रिलामाईडचा या रसायनाचा मेंदूवर (नर्व्ह सिस्टीमवर) आणि कॅन्सरशी (कर्करोगाशी) संबंध असल्याचे काही संशोधनात दिसून आले आहे. इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर द्वारे या आंतरराष्ट्रीय संस्थेने ॲक्रिलामाइडचे मानवी कर्करोगजन्य म्हणून वर्गीकृत केले आहे. हे वर्गीकरण प्रयोगशाळेतील प्राण्यांवर केलेल्या अभ्यासांवर आधारित आहे. मानवांमध्ये आहारविषयक अभ्यासांमध्ये, सामान्य सेवन पातळीवर कर्करोगाच्या धोक्याशी ॲक्रिलामाईडचा मजबूत संबंध सातत्याने दिसून आलेला नाही.

ॲक्रिलामाइडचे शरीरात गेल्यावर ग्लायसिडामाइड मध्ये रूपांतर होते; जे जनुकांना हानी पोहोचवू शकते. माणसांवर केलेल्या अभ्यासांमध्ये सामान्य अन्नपातळीवर ॲक्रिलामाइड आणि कॅन्सर यांचा थेट संबंध ठामपणे दिसलेला नाही. पण, तरीही एफडीए आणि डब्ल्यूएचओ सारख्या संस्था सांगतात की, या पदार्थाचं सेवन शक्य तितके कमी ठेवावे. कारण दीर्घकाळ – सेवन केल्यास आरोग्यास हानिकारक ठरू शकतात.

याव्यतिरिक्त, काही कमी दर्जाच्या किंवा कृत्रिमरित्या चव असलेल्या भाजलेल्या चण्यांमध्ये प्रिझर्वेटिव्ह्ज (जसे की सोडियम बेंझोएट), कृत्रिम रंग किंवा चव वाढवणारे (जसे की एमएसजी) असू शकतात, जे पचनसंस्थेला त्रास देऊ शकतात किंवा संवेदनशील व्यक्तींमध्ये ॲलर्जी निर्माण करू शकतात; असे शर्मा यांनी म्हटले आहे.

सुरक्षित राहण्यासाठी, पॅक करण्यात आलेले भाजलेले चणे खरेदी करण्यापूर्वी नेहमीच लेबल काळजीपूर्वक तपासा. कमी तापमानावर भाजलेले, संरक्षक घटक नसलेले चणे घेऊ नका आणि १०० टक्के नैसर्गिक घटक असलेल्या चण्यांना प्राधान्य द्या. जर तुम्ही सैल भाजलेले चणे विकत घेत असाल; तर स्वच्छ ठिकाणाहून घेतले आहेत ना याची खात्री करा. तसेच त्यांना जळका किंवा रासायनिक वास येत नाही याकडे सुद्धा लक्ष द्या. तर भाजलेल्या चण्याचे सेवन कमी करण्यासाठी तुम्ही पुढील गोष्टी करू शकता सोनेरी रंग – सर्वात महत्त्वाचा नियम म्हणजे भाजलेले चणे गडद तपकिरी किंवा कुरकुरीत, जळलेल्या रंगापेक्षा सोनेरी, पिवळ्या किंवा हलक्या रंगात भाजून घ्या. गडद तपकिरी रंग जास्त प्रमाणात ॲक्रिलामाइड तयार होण्याचे संकेत देतो; असे डॉक्टर बत्रा म्हणाले.कमी तापमान, जास्त वेळ – चणे घरी भाजताना, खूप जास्त आचेवर भाजण्यापेक्षा, थोडे कमी तापमानात जास्त वेळ भाजा. चणे धुवा – कच्चे चणे शिजवण्यापूर्वी भिजवून आणि पूर्णपणे धुवून घेतल्याने पृष्ठभागावरील साखरेचे काही भाग धुण्यास मदत होऊ शकते; ज्यामुळे पूर्वसूचक घटक कमी होण्याची शक्यता असते.संतुलित आहार – ताजी फळे, भाज्या यांसारखे गरम न केलेले पदार्थ निरोगी आणि संतुलित आहार खाणे सुरू ठेवा, जेणेकरून भाजलेले चणे तुमच्या एकूण वापराचा एक छोटासा भाग असतील.

## राजस्थनी पद्धतीमध्ये झटपट बनवा ‘मिरची के टिपोरे’, चटपटीत रेसिपी पाहून सगळ्यांच्या तोंडाला सुटेल पाणी

जेवणाच्या ताटात जर चटणी किंवा लोणचं असेल तर जेवणाची चव आणखीनच सुंदर लागते. सगळ्यांचं चटपटीत पदार्थ खायला खूप जास्त आवडतात. जेवणात कायमच कैरीचे लोणचं, मिरची लोणचं, लसूण चटणी, खोबऱ्याची चटणी इत्यादी अनेक पदार्थ खाल्ले जातात. जेवणाऱ्या बऱ्याचदा चपाती भाजी खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन चविष्ट पदार्थ खाण्याची सगळ्यांचं खूप जास्त इच्छा होते. अशावेळी तुम्ही राजस्थनी पद्धतीमध्ये मिरची के टिपोरे बनवू शकता. हा ताज्या हिरव्यागार मिरच्यांपासून बनवला जातो. देशभरात अनेक वेगवेगळ्या मसाल्यांचा वापर करून चविष्ट पदार्थ बनवले जातात. या पदार्थांची चव चाखण्यासाठी चाहत्यांची मोठी गर्दी असते. चला तर जाणून घ्या राजस्थनी पद्धतीमध्ये झटपट मिरची के टिपोरे बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: हिरव्या मिरच्या धणे पावडर जिऱ्याची पावडर बडीशेप लाल तिखट हळद मीठ हिंग जिरं मोहरी कलौंजी काळेमीठ आमचूर पावडर कृती: मिरची के टिपोरे बनवण्यासाठी सर्वप्रथम, हिरव्या मिरच्या स्वच्छ पाण्याने धुवून त्यांचे देठ काढा. त्यानंतर मिरच्या मध्यम आकारात कापून घ्या. याशिवाय मिरच्यांमधील बिया काढा. यामुळे मिरच्या जास्त तिखट लागणार नाहीत. भांड्यात हळद, धणे पावडर, जिरेपूड, बडिशेप पावडर, लाल तिखट घेऊन व्यवस्थित मिक्स करा. सर्व साहित्य व्यवस्थित मिक्स करून काहीवेळ बाजूला ठेवा. कढईमध्ये तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, कलौंजी घालून फोडणी घ्या. त्यानंतर त्यात हिरव्या मिरच्या आणि तयार केलेला सुका मसाला घालून व्यवस्थित मिक्स करा. त्यानंतर त्यात चवीनुसार काळे मीठ, आमचूर पावडर आणि साधं जेवणातील मीठ घालून मिक्स करून घ्या. मिरच्यांना एक वाफ काढून गॅस बंद करा. मिरचीचे मिश्रण पूर्णपणे थंड झाल्यानंतर काचेच्या डब्यात भरून ठेवा.



## हिवाळ्यातील पौष्टिक भाज्यांची मजा लुटा, घरी बनवा मसालेदार अन् चमचमीत ‘व्हेज कोल्हापुरी’

भरपूर भाज्या वापरून व्हेज कोल्हापुरी ही डिश तयार केली जाते

हिवाळ्यात बाजारात भरपूर भाज्या येतात, ज्यामुळे या काळात व्हेज कोल्हापुरी बनवणं चांगला पर्याय ठरेल

याची चव फार झणझणीत आणि स्वादिष्ट लागते

कोल्हापूर या महाराष्ट्रातील ऐतिहासिक शहराचं नाव ऐकलं की तिखट–मसालेदार पदार्थांची आठवण लगेच येते. कोल्हापुरी मिसळ, पंढरीची रसोई आणि मसालेदार झणझणीत पदार्थांचा खास अंदाज जगभरात प्रसिद्ध आहे. या चवीचा अनुभव देणारा एक अतिशय प्रसिद्ध पदार्थ म्हणजे व्हेज कोल्हापुरी. हा एक अस्सल मराठमोळा चवदार डिश आहे, ज्यात विविध भाज्या, तिखट मसाले आणि नारळ–खोबऱ्याचा खमंग सुगंध एकत्र येतो. रोटी, भाकरी, नान किंवा जिरा राईससोबत ही डिश अप्रतिम लागते. हॉटेलमध्ये मिळणाऱ्या व्हेज कोल्हापुरीची चव आपण घरच्या घरी अगदी सहज तयार करू शकतो. चला तर पाहूया ही स्वादिष्ट आणि झणझणीत व्हेज कोल्हापुरी रेसिपी.

साहित्य

भाज्यांसाठी:

गाजर – १ (चिरलेलं)
बटाटा – १ (क्युबमध्ये कापलेला)
फुलकोबी – १ कप (तुकडे केलेले)
शेंगा – ७ ते ८ (कापलेल्या)
मटार – अर्धा कप
कांदा – १ मोठा (चिरलेला)
टोमॅटो – २ मध्यम (चिरलेले)
आले–लसूण पेस्ट – १ टीस्पून
तेल – ३ टेबलस्पून
मीठ – चवीनुसार
कोथिंबीर – सजावटीसाठी

कोल्हापुरी मसाला तयार करण्यासाठी:

सुके खोबरे (किसलेले) – २ टेबलस्पून



खसखस – १ टीस्पून
काजू – ५ ते ६
धने – १ टेबलस्पून
जिरे – १ टीस्पून
बडीशेप – १ टीस्पून
लवंगा – २
दालचिनी – १ छोटा तुकडा
काळी मिरी – ५ ते ६ दाणे
सुके लाल मिरचे – ४ ते ५
हळद – अर्धा टीस्पून

नागपूरची फेमस ‘सांबरवडी’ खाल्ली आहे का? नाही तर मग या पारंपरिक पदार्थाची घरीच तयार करा मेजवानी

कृती

यासाठी सर्व भाज्या स्वच्छ धुवून घ्या आणि थोडं मीठ व पाण्यात उकळून घ्या, म्हणजे त्या अर्धवट शिजतील.

एका पॅनमध्ये थोडंसं तेल गरम करा आणि त्यात धने, जिरे, बडीशेप, लवंग, दालचिनी, काळी मिरी, लाल मिरच्या, खोबरे आणि खसखस घाला.

हे सर्व मसाले मंद आचेवर भाजा जोपर्यंत त्यांचा खमंग वास येत नाही.

भाजलेले मसाले थंड झाल्यावर मिक्सरमध्ये टाका. त्यात काजू आणि थोडं पाणी घालून बारीक वाटून घ्या. हा आपला कोल्हापुरी मसाला तयार आहे.

एका खोल कढईत तेल गरम करा. त्यात आले–लसूण पेस्ट आणि चिरलेला कांदा घालून परतवा. कांदा हलका सोनेरी झाला की टोमॅटो घाला आणि नरम होईपर्यंत शिजवा.

आता त्यात तयार केलेला मसाला घाला आणि ५ मिनिटे मंद आचेवर परतवा. मसाला नीट परतल्यावर त्यात थोडं पाणी घालून घट्ट ग्रेवी तयार करा.

उकडलेल्या भाज्या या ग्रेवीत घाला, मीठ टाका आणि ७ ते ८ मिनिटे मंद आचेवर शिजू द्या. वरून कोथिंबीर टाकून गॅस बंद करा.

गरमागरम व्हेज कोल्हापुरी बटर नान, तंदुरी रोटी किंवा जिरा राईससोबत सर्व्ह करा. याची तिखट–मसालेदार आणि सुगंधी चव प्रत्येक घासाला महाराष्ट्राची आठवण करून देते.

## रात्रीच्या जेवणात भाजी काय बनवावी सुचत नाही? मग सोप्या पद्धतीमध्ये बनवा खरपूस भाजलेल्या बटाट्याची खमंग भाजी

लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं बटाट्याची भाजी खायला खूप जास्त आवडते. बटाटाची भाजी बनवल्यानंतर लहान मुलं आवडीने जेवतात. पण कायमच बटाट्याची भाजी खाऊन सगळ्यांचं कंटाळा येतो. बटाटा शिजवून, वाफवून, उकडून, परतून इत्यादी अनेक पद्धतीने बनवला जातो. रात्रीच्या जेवणात प्रत्येकालाच चमचमीत पदार्थ खाण्यास हवे असतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये भाजलेल्या बटाट्याची खमन्ग भाजी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या भाजीला कोळश्याचा सुगंध आणि चव लागते. भाकरी किंवा गरमागरम पराठ्यासोबत तुम्ही बटाट्याची भाजी खाऊ शकता. हा पदार्थ बनवण्यासाठी अतिशय कमी साहित्य लागते. कमीत कमी वेळात तुम्हाला जर भाजी बनवायची असेल तर तुम्ही भाजलेल्या बटाट्याची भाजी बनवू शकता. चला तर जाणून घेऊया भाजलेल्या बटाट्याची खमंग भाजी. साहित्य: बटाटा दही लाल तिखट हळद कोथिंबीर मीठ टोमॅटो लसूण हिरवी मिरची जिरं कृती: भाजलेल्या बटाट्याची भाजी बनवण्यासाठी सर्वप्रथम, गॅस चालू करून त्यावर जाळी ठेवा. जाळीवर बटाटे ठेवून व्यवस्थित भाजून घ्या. बटाटे पूर्णपणे भाजल्यानंतर काहीवेळ थंड होण्यासाठी ठेवा. त्याच जाळीवर टोमॅटो सुद्धा भाजा. त्यानंतर भाजलेल्या बटाट्याची साल काढून बटाटे हाताने मॅश करा. मिक्सरच्या भांड्यात धणे, सुकी लाल मिरची, जिरं, भाजून घेतलेल्या हिरव्या मिरच्या, लसूण पाकळ्या मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक वाटून घ्या. कढईमध्ये तेल गरम करून त्यात तयार केलेला मसाला घालून तेल सुटेपर्यंत भाजा. त्यानंतर त्यात मॅश केलेला बटाटा आणि टोमॅटो, दही घालून मिक्स करा. आवश्यकता वाटल्यास थोडस पाणी घालून भाजी व्यवस्थित शिजवा. यामुळे पदार्थाला सुंदर चव लागेल. सगळ्यात शेवटी बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून गॅस बंद करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली भाजलेल्या बटाट्याची भाजी. हा पदार्थ लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.



## नागपूरची फेमस ‘सांबरवडी’ खाल्ली आहे का? नाही तर मग या पारंपरिक पदार्थाची घरीच तयार करा मेजवानी

सांबरवडी ही नागपूरची फेमस आणि पारंपारिक डिश आहे

याची चव मसाल्यांनी भरपूर आणि कुरकुरीत लागते

फास्ट फूडच्या जगात या पारंपारिक पदार्थाची चव तुम्हाला सुख देऊन जाईल

नागपूर म्हटलं की संत्र्यांबरोबरच अजून एक खास गोष्ट सगळ्यांच्या जिभेवर चढलेली आहे ती म्हणजे सांबरवडी! ही पारंपरिक डिश नागपूरची ओळख बनली आहे. बाहेरून कुरकुरीत, आतून मसालेदार आणि रसाळ भराव असलेली ही सांबरवडी अनेक दशकांपासून नागपूरकरांच्या हृदयात राज्य करत आहे. विशेष म्हणजे ही वडी सण–उत्सवात, पाहुणचारात किंवा संध्याकाळच्या चहाबरोबर दिली तरी प्रत्येक वेळी तिचा स्वाद अविस्मरणीय वाटतो. तिच्या सुगंधानेच भूक वाढते, आणि पहिला घास घेताच तिच्या मसाल्याचं आणि बेसनाच्या कवचाचं अप्रतिम मिश्रण जिभेवर विरघळतं. चला तर मग जाणून घेऊया ही खास नागपुरी सांबरवडी घरच्या घरी कशी तयार करायची.

साहित्य

भरावासाठी साहित्य:

किसलेले नारळ – एक वाटी
किसलेले कांदे – एक वाटी
बारीक चिरलेली कोथिंबीर – अर्धी वाटी
खोबरं आणि शेंगदाणे कुट – दोन टेबलस्पून
आलं–लसूण पेस्ट – एक चमचा
तिखट – एक चमचा
धने–जिरे पूड – एक चमचा
गरम मसाला – अर्धा चमचा
मीठ – चवीनुसार
थोडासा लिंबूरस किंवा आमचूर

बाहेरील आवरणासाठी:

बेसन – दोन वाट्या
तांदळाचं पीठ – अर्धी वाटी
मीठ – चवीनुसार
थोडं हळद आणि अजवाइन
पाणी – गरजेनुसार
तळण्यासाठी तेल

रात्रीच्या जेवणात भाजी काय बनवावी सुचत नाही? मग सोप्या पद्धतीमध्ये बनवा खरपूस भाजलेल्या बटाट्याची खमंग भाजी

कृती

यासाठी सर्वप्रथम एका पॅनमध्ये थोडं तेल गरम करून त्यात कांदे परतून घ्यावेत. कांदे सोनेरी झाले की त्यात आलं–लसूण पेस्ट, तिखट, धने–जिरे पूड, गरम मसाला आणि मीठ टाकून नीट परतावं.

नंतर त्यात किसलेलं नारळ, खोबरं–शेंगदाणे कुट, कोथिंबीर आणि थोडा लिंबूरस घालून मिश्रण तयार करावं. हे मिश्रण थंड झाल्यावर बाजूला ठेवावं.

दुसऱ्या भांड्यात बेसन, तांदळाचं पीठ, मीठ, हळद आणि अजवाइन घालून पाणी टाकत घट्ट पिठाचं मिश्रण तयार करावं.



आता या पिठाचे लहान गोळे करून त्यात एकेक चमचा भराव भरून वडीसारख्या आकारात तयार कराव्यात.

कढईत तेल गरम करून या वड्या मध्यम आचेवर सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्याव्यात.

गरमागरम सांबरवडी पुदिन्याच्या चटणी, चिंचेच्या चटणी किंवा टोमॅटो सॉसबरोबर सर्व्हे करा. बाहेरून

गरमागरम सांबरवडी पुदिन्याच्या चटणी, चिंचेच्या चटणी किंवा टोमॅटो सॉसबरोबर सर्व्हे करा. खुसखुशीत आणि आतून मसालेदार असा तिचा स्वाद एकदा खाल्ल्यावर पुन्हा पुन्हा आठवेल.

# फिर्यादीच निघाला आरोपी – खोटी तक्रार दिल्याचा एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी केला पर्दाफाश.




लातूर :– फिर्यादीच निघाला आरोपी – खोटी तक्रार दिल्याचा एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी केला पर्दाफाश. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी सुमारे १४.३० वाजेच्या सुमारास, फिर्यादी भानुदास मुकुंदराव बिरादार (वय ६० वर्षे), व्यवसायाने सेवानिवृत्त शिक्षक, रा. कोर्ट कॉलनी, पठाणवाडी, लातूर, यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, नमूद वेळी दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या घरी येऊन त्यांना बाहेर बोलावले व त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांची सोन्याची चेन खेचून चोरून नेली, तसेच तिसरा साथीदार रिक्षामधून तिथून पळून गेला.

फिर्यादीच्या या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अनोळखी तीन इसमांविरुद्ध चेन स्नॅचिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेची गांभीर्याची दखल घेत पोलीस अधीक्षक लातूर यांच्या सूचनेवरून अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाची तात्काळ स्थापना करण्यात आली. तपासादरम्यान बारकाईने टेक्निकल व गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती मिळवून मिळालेल्या माहितीचे बारकाईने विश्लेषण करण्यात आले मात्र, फिर्यादीने सांगितलेल्या वेळेत आणि ठिकाणी कोणतीही चेन स्नॅचिंगची घटना आढळून आली नाही. इलेक्ट्रॉनिक पुरावे व इतर तांत्रिक पुरावे तपासले असता, गुन्हा घडल्याचा कोणताही ठोस पुरावा आढळून आला नाही. स्थानिक गुप्त माहितीदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा काही लोकांसोबत वैयक्तिक वाद असल्याचे समोर आले. त्या वादातील व्यक्तींना अडकवण्यासाठी त्यांनी जाणूनबुजून खोटी फिर्याद दिली असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले.

तपासादरम्यान पोलीसांनी फिर्यादीकडून चौकशी केल्यावर सुरुवातीला त्यांनी टाळाटाळ केली. मात्र, तांत्रिक पुरावे समोर ठेवल्यानंतर त्यांनी शेवटी गुन्हा खोटा असल्याची कबुली दिली. तपासादरम्यान फिर्यादीकडून सदर सोन्याची चेन जप्त करून, पडताळणी केली असता ती फिर्यादीच्या मालकीचीच असल्याचे सिद्ध झाले. यानंतरसदरचेनफिर्यादीच्यापत्नीसपरतकरण्यातआलीआहे.

खोटी तक्रार देऊन पोलीस प्रशासनास दिशाभूल केल्याबद्दल फिर्यादी भानुदास मुकुंदराव बिरादार यांच्या विरुद्ध प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई मा. श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर; मा. श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर तसेच मा. श्री. समीररसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग लातूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे, सहायक फौजदार भिमराव बेल्लाळे, पोलीस अंमलदार बळवंत भोसले, दामोदर मुळे, राजाभाऊ मस्के, विश्वंभर तुरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

सदरगुन्ह्याचापुढीलतपासपो.उ.नि.श्रीकांतमोरेहेकरीतआहेत.

नागरिकांना आवाहन :

लातूर पोलीस नागरिकांना नम्रपणे आवाहन करतो की – खोटी तक्रार देणे हे गंभीर गुन्हा असून, अशा कृत्यामुळे शासकीय यंत्रणेचा वेळ आणि संसाधनांचा अपव्यय होतो. अशा प्रकारे खोटी फिर्याद देणाऱ्यांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी कोणतीही तक्रार देताना प्रामाणिक व वस्तुनिष्ठ माहितीच द्यावी जेणेकरून पोलीस तपास प्रभावीपणे करता येईल.

## उमंग सेंटरमध्ये जागतिक ऑक्युपेशनल थेरपी दिन साजरा – दिव्यांग मुलांसाठी मान्यवरांचा मदतीचा हात



लातूर :– जागतिक ऑक्युपेशनल थेरपी दिनाचे औचित्य साधून उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम अँड मल्टी डिसॅबिलिटी रिसर्च सेंटर, लातूर येथे एक आगळावेगळा पालक मेळावा, विविध खेळांचे आयोजन तसेच मान्यवरांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी, जटाळ हॉस्पिटलचे संचालक डॉ. एस. एन. जटाळ, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी, कावेरी हॉस्पिटलचे संचालक डॉ. अनिल राठी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांनी उमंग सेंटरमधील थेरपी विभाग, सेंसरी पार्क आणि दिव्यांग मुलांसाठी उपलब्ध असलेल्या अद्ययावत सुविधा पाहून समाधान व्यक्त केले. या वेळी डॉ. प्रशांत उटगे यांनी सेंटरच्या विविध उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की उमंग सेंटरने लातूर, नागपूर, पुणे आणि नांदेड येथे दिव्यांग मुलांसाठी विशेष थेरपी सेवा सुरू केली असून अनेक पालकांना त्यांच्या मुलांच्या प्रगतीबद्दल नवीन आशा निर्माण झाली आहे. या कार्यक्रमादरम्यान श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी म्हणाले, अशा दिव्यांग मुलांना समाजात आणण्यासाठी आणि त्यांना सामान्य जीवन देण्यासाठी आपणा सर्वांची जबाबदारी आहे. थेरपी व योग्य उपचारांद्वारे या मुलांना बरे करता येते, आणि अशा प्रकारचे आधुनिक सेंटर लातूरमध्ये उपलब्ध आहे हे शहरासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांनी उमंगच्या सर्व कर्मचाऱ्यांचे तोंडभरून कौतुक केले आणि उमंगसाठी काही मदत लागली तर मला जरूर कळवावी असे सांगत पुढील काळातही मदतीचे आश्वासन दिले. त्याचप्रमाणे डॉ. एस. एन. जटाळ यांनी दिव्यांग मुलांसाठी देणगी स्वरूपात धनादेश सुपूर्द केला, तसेच डॉ. एस. एन. जटाळ (संचालक, जटाळ हॉस्पिटल) यांनीही उमंग सेंटरमध्ये उपचार सुरू ठेवण्यासाठी स्वतःहून आर्थिक मदतीचे आश्वासन दिले. रमेशजी बियाणी यांनीही पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पालकांनी खचून न जाता आपल्या मुलांना सामाजिक जीवनात सहभागी करून घ्यावे; योग्य थेरपी आता आपल्या लातूर शहरातच उपलब्ध आहे आणि डॉ. प्रशांत उटगे यांच्या रूपाने दिव्यांगांसाठी सेवाभावी व्यक्ती आपल्याला लाभली आहे. कार्यक्रमात डॉ. अर्जुन राठोड यांनी ऑक्युपेशनल थेरपीचे महत्त्व स्पष्ट करत उपस्थित पालकांना या थेरपीच्या माध्यमातून मुलांचे जीवनमान सुधारण्याचे मार्गदर्शन केले. या विशेष दिवशी आयोजित विविध खेळांमध्ये सहभागी झालेल्या पालक व दिव्यांग मुलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या प्रसंगी किरण उटगे (प्रकल्प संचालक, उमंग सेंटर), रामेश्वर जाधव, अॅड. श्रीहरी गोरे (व्यवस्थापक, उमंग सेंटर), डॉ. श्रीशैलम तलारी, डॉ. अमिन नादेर, डॉ. वैभव उटगे, डॉ. गणेश डोंगरे, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. प्रतिक केंद्रे, डॉ. वैष्णवी शिंगण, डॉ. प्रविण राठोड, माणिक करमले, मेहराज खान, केदार पंडित, हसन चाऊस, प्रतिक्षा टिपराळे, सचिन कौळखेरे, विजय सुरवसे, सिमा साबळे, अभिजित नरवटे, सादिक शेख, वैष्णवी शेटे, निता हुडगे, ज्ञानेश्वर ससाने, यांच्यासह पालक वर्ग आणि कर्मचारी मोठ्या संख्येन उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे उमंग सेंटर हे दिव्यांग मुलांसाठी नव्या आशेचे केंद्र ठरले आहे. जागतिक ऑक्युपेशनल थेरपी दिनानिमित्त उमंगमध्ये झालेला हा उपक्रम समाजात दिव्यांग मुलांच्या समावेशासाठी प्रेरणादायी ठरला असून, या माध्यमातून थेरपीद्वारे जीवनात बदल हा संदेश सर्वत्र पोहोचवण्यात आला आहे.

## नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीसाठी काँग्रेस घेणार इच्छुकांच्या सोमवारी मुलाखती! प्रदेश समिती १२ नोव्हेंबरला अंतिम यादी करणार!

लातूर : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्यावतीने लातूर जिल्ह्यातील चार नगरपरिषदा व एका नगरपंचायतीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती सोमवारी (दि. १० नोव्हेंबर) लातूर येथे काँग्रेस भवनात होणार आहेत. त्यानंतर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या प्रदेश निवड समितीची बैठक १२ नोव्हेंबर रोजी होणार असून, यामध्ये उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्याने लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने आघाडी घेत आपली व्यूहरचना मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पक्षनिरीक्षक नेमून संघटन बळकट केले आहे. लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आमदार अमित विलासराव देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुकांची जोरदार तयारी सुरू केली आहे. नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकीसाठी पक्षाकडे अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती काँग्रेस भवनात सोमवारी (दि.१०) सकाळी दहा वाजल्यापासून घेण्यात येणार आहेत. सकाळी १० वाजता औसा नगर परिषदेसाठी, दुपारी १२ वाजता उदगीर नगर परिषदेसाठी, दुपारी २ वाजता अहमदपूर नगरपरिषदेसाठी, दुपारी ४ वाजता निलंगा नगरपरिषदेसाठी, तर सायंकाळी ६ वाजता रेणापूर नगरपंचायतीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होतील.माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा निवड समिती या मुलाखती घेणार असून या समितीमध्ये खा. डॉ. शिवाजी काळगे,माजी आमदार वैजनाथ शिंदे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, शहर जिल्हाध्यक्ष ड. किरण जाधव यांच्यासह निरीक्षक डॉ. जितेंद्र देहाडे, अलका राठोड, धनराज राठोड, डॉ.श्रावण रॅपनवाड, प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे, प्रदेश सचिव श्रीशैल उटगे, प्रदेश सचिव विद्याताई पाटील, प्रदेश सचिव ड. समद पटेल, प्रदेश सचिव कल्याण पाटील, प्रदेश सचिव एन.आर.पाटील, प्रदेश सचिव डॉ. दिनेश नवगिरे यांचा समावेश आहे. मुलाखतीनंतर ही समिती इच्छुक उमेदवारांच्या शिफारसी प्रदेश काँग्रेसकडे पाठवेल. त्यानंतर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या प्रदेश निवड समितीची बैठक १२ नोव्हेंबर रोजी होणार असून, यामध्ये उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे.

## घर हक्क संघर्ष समिती, महाराष्ट्र अध्यक्षपदी : कैलास सरकटे यांची बिनविरोध निवड

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक ०६/११/२०२५ रोजी घर हक्क संघर्ष समिती कोअर कमिटीची महत्वपूर्ण बैठक (शे का प) कार्यालय एनबीसी कॉम्प्लेक्स ११९ पहिला मजला सेक्टर –११ सीबीडी बेलापूर येथे प्रमुख पदाधिकारी, युवा साथी यांच्या उपस्थितीत पार पडली, सदर प्रसंगी खाजामिया पटेल ( उपाध्यक्ष, घर हक्क संघर्ष समिती ), विनीता बाळेकुंद्री (महिला अध्यक्ष, घर हक्क संघर्ष समिती ), सुनंदाताई बाविस्कर ( महिला उपाध्यक्ष, घर हक्क संघर्ष समिती ), राजु वंजारे (सचिव, घर हक्क संघर्ष समिती ), मुख्य सल्लागार एड. सुजित निकाळजे (घर हक्क संघर्ष समिती ), यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली या महत्त्वपूर्ण बैठकीमध्ये बऱ्याच महत्वपूर्ण विषयावर सविस्तर चर्चा झाली, घर हक्क संघर्ष समितीचे संस्थापक, कॉम्रेड दिवंगत : हिरामण पगार सर यांनी उभारून दिलेला गोरगरिबांच्या हक्कांच्या लढ्यामध्ये आपण सर्वांनी एक मताने काम करण्याची शपथ घेऊन हा लढा आपल्याला अधिक जोमाने पुढे घेऊन जायचा आहे या कामी एकमताने कैलाश सरकटे यांची घर हक्क संघर्ष समितीच्या महाराष्ट्र अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली, त्यावेळी अशोक जमादार, उल्हास नेरुरकर, कोंडीबा हिंगोले, दत्ता बनसोडे,




भैय्यासाहेब आठवले, भगवान चाबुकस्वार, एड. अमोल चंदनशिवे, दिलीप चव्हाण, संतोष ढवळे, बुधा ठाकुर, विजय तुनगर, गोविंद वेताळ, कलावती माळी, छायाताई जाधव, ज्योतीताई धिवरे, राणी खोसला, वैशाली डोंगरे, युवा साथी अजय बोरकर, सुकन्या जाधव, सतीताई भिडे, शांता खोत, पोर्णिमा ताई कवाळे, हजर होते इथून पुढील काळात हिरामण पगार दादा यांचा आदर्श घेऊन याही पुढे हा लढा तेवढ्याच जोमाने पुढे नेव्हुन सर्वांनी काम करण्याचे मान्य केले लढेंगे जितेंगे...

## केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन ! ग्रामीण भागातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी पर्वणी !

केज/प्रतिनिधी कृषिधन,शिंजीर मिल्क एड ग्रो प्रोड्युसर कंपनी केज यांच्या वतीने दि.७ ते ९ हे तीन दिवशीय कृषी प्रदर्शन विठाई मंगलकार्यालय येथे सुरू झाले. कृषी प्रदर्शनाची सुरुवात शालेय विद्यार्थी यांच्या शोभायात्रा काढून झाली.कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन खा. बजरंग सोनवणे, हवामान तज्ञ पंजाबराव डक, तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे, पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे,विकास मिरगणे,हनुमंत भोसले,यांच्या हस्ते व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भव्य कृषी प्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन झाले. केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. उद्घाटक खा .बजरंग सोनवणे म्हणाले ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी ही एक पर्वणी आहे शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढवता येईल. शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनास भेट देऊन तंत्रज्ञान अवगत करावे कृषी प्रदर्शन आयोजक कंपनीचे अभिनंदन करून केले. हवामान अभ्यासक पंजाबराव डक म्हणाले शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजानुसार आपल पीक व्यवस्थापन करावे. तंत्रज्ञाना शिवाय शेतीला पर्याय उरलेला नाही. कमी खर्चात अधिक उत्पन्न घेण्यासाठी अभ्यासपूर्ण शेती करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित त्यांनी प्रदर्शनाची पाहणी करून शुभेच्छा दिल्या आज आणि उद्या दोन दिवस हे कृषी प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहेजिल्हयातील सर्व शेतकरी बांधव, महिला बचत गट, शेतकरी गट, व्यवसायीक यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कंपनीचे संचालक विशाल चौरे यांनी केले. या प्रदर्शनात महाराष्ट्रातील शेतीशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञान , पाणी व्यवस्थापन , पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी झाल्या आहेत. केज तालुक्यात पहिल्यांदाच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांनी,शेतकरी गटांनी कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या मध्ये शिंजीर मिल्क एड ग्रो प्रोड्युसर कंपनीने पुढाकार घेत या



कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी येत आहेत प्रदर्शनामध्ये प्रगत शेती मशिनरी , आधुनिक साधने ,सुधारीत बीयाणे, खते ,किटक नाशके ,दुग्धव्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके आहेत. हे प्रदर्शन शेतकरी, व्यापारी, विक्रेते, वैज्ञानिक, विदयार्थी यांच्यासाठी एक व्यासपीठ म्हणुन उपलब्ध आहे. यामुळे आपल्या जिल्हयातील तसेच मराठवाडयातील शेतीतील व शेतीपुरक व्यवसायातील उत्पादनासाठी निश्चीतच मदत होईल. असे मत उपस्थितांनी व्यक्त केले हे कृषी प्रदर्शन मराठवाडयातील पारंपारीक शेतीचे देखावे हे या कृषी प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरले आहे. पहिल्या कृषी प्रदर्शनात शेतकरी, महिला बचत गट, व्यावसायिक विद्यार्थी यांनी भेटी दिल्या.

# अंशतः अनुदानित शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्राधान्य - श्रीमती प्रियाराणी पाटील

**शिक्षण विभागांची कार्य तत्परता कौतुकास्पद- वैजनाथ चाटे**

राज्यातील अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांनी अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे. शासनाच्या निर्णयामुळे या शिक्षकांच्या कार्याला यश मिळाले आहे.

ऐन दिवाळी या शिक्षकांच्या खात्यात २० टक्के वाढीव टप्पा अनुदान वितरण करण्याबाबत शिक्षण विभागाने दाखविलेली कार्य तत्परता कौतुकास्पद आहे. यापुढे ही शिक्षण विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावतील अशी अशा व्यक्त केली.

**जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रश्नी शिक्षण विभाग सदैव सकारात्मक- जितेंद्र डोंगरे**

बीड जिल्ह्यातील अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या प्रत्येक प्रश्नांच्या बाबतीमध्ये शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांच्यासोबतच सर्व अधिकारी वर्ग सातत्याने सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मकता दाखवत आहेत. अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शिक्षकांच्या बाबतीत असलेल्या अडचणी त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्य देतात.

यापुढेही आपले सहकार्य असेच कायम राहावे अशी मागणी या वेळी छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे यांनी केली.

**आपल्या काळात शंभर टक्के अनुदान मिळो– बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ**

बीड जिल्हा माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, तुरुकमारे, विस्तार अधिकारी मनोज धस आणि इतर शिक्षण विभागातील सर्व अधिकारी महोदयांच्या सहकार्यामुळेच आज २० टक्के वाढीव टप्पा अनुदाना प्रमाणे शिक्षकांच्या खात्यात वाढीव पगार जमा झाला. याचे सर्व श्रेय शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम व त्यांचे संपूर्ण सहकाऱ्यांना जाते. त्या बद्दल आपण सर्व अभिनंदनास पात्र आहात.

आपल्या सारख्या चांगल्या अधिका–यांमुळे जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव टप्प्याप्रमाणे अनुदान पदरात पाडून घेण्यासाठी जास्त संघर्ष किंवा कष्ट लागले नाही. या पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा म्हणजे शंभर टक्के अनुदान आपल्याच काळात मिळावे असेही अपेक्षा विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी व्यक्त केली.

बीड/प्रतिनिधी :– जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील असते. विशेष म्हणजे विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांना सदैव प्राधान्य देत असते, यापुढेही प्राधान्याने अंशतः अनुदानित आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न मार्ग लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे मत माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांनी बीड जिल्हा अंशतः अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी बोलताना सांगितले. शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांचा कृती समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यााबाबत अधिक माहिती अशी की, राज्य सरकारने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव



२० टक्के अनुदान मंजूर केले. सदर वाढीव २० टक्के अनुदाना प्रमाणे ऑक्टोबर महिन्याचे वेतन या शाळेतील सर्व शिक्षकांनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे काम तातडीने करून दिल्याबद्दल आज शुक्रवार दिनांक ७ रोजी बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम, उपशिक्षणाधिकारी श्री तुरुकमारे यांच्यासह पे युनिटचे अधीक्षक श्री राजेश खटावकर, वरिष्ठ मुख्य लिपिक श्री चाटे आणि वरिष्ठ लिपिक श्री खडकीकर यांचा सत्कार विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा अध्यक्ष श्री. वैजनाथ चाटे सर, छत्रपती संभाजीनगर कार्याध्यक्ष श्री जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, श्री बाळासाहेब नागरगोजे सर, श्री. सुरेश कदम सर, श्री. खाडे सर, श्री. नामदेव मुंडे सर, श्री. शेख सर, श्री. गंगार्डे सर, श्री. लहाने सर यांनी केला.

या सत्कार प्रसंगी बोलताना शिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया राणी मॅडम म्हणाल्या की, मी बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहे. विशेष म्हणजे विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांबद्दल मला जाण आहे. त्यांचा खडतर संघर्ष आहे याची मला कल्पना आहे. त्यामुळे या शिक्षकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाप्रती मला सातत्याने सहानुभूती निर्माण होते. त्यामुळे त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी पुढाकार घेऊन सदैव प्राधान्य देत असते, यापुढेही प्राधान्याने अंशतः अनुदानित आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न मार्ग लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

यावेळी विनाअनुदानित शाळा कृती समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नामदेव मुंडे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री सुरेश कदम मामा यांनी मानले.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर–४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.